# पुणेरी पलटनचा बंगाल वॉरियर्सवर दमदार विजय! आदित्य - पंकज चमकले

चेन्नई, ३० सप्टेंबर २०२५: प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धेतील १२ व्या हंगामातील ५६ व्या सामन्यात पुणेरी पलटन आणि बंगाल वॉरियर्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. एसडीटी मल्टीपर्पज स्टेडियममध्ये पार पडलेल्या सामन्यात पुणेरी पलटनने बंगाल वॉरियर्सवर ४९- ४४ ने विजय मिळवला. या सामन्यात आदित्य शिंदेने १८ तर पंकज मोहितेने १० गुणांची कमाई केली. तर देवांकने २५ गुणांची कमाई केली.

या सामन्यात पुणेरी पलटनकडून अस्लम इनामदार पहिली चढाई करण्यासाठी आला. पहिल्याच चढाईत १ गुण घेत त्याने संघाला दमदार सुरुवात करून दिली. बंगाल वॉरियर्स कडून देवांकला पहिल्या चढाईत एकही गुण घेता आला नव्हता. दुसऱ्या चढाईत पुणेरी पलटनने त्याची यशस्वी पकड केली. चौथ्या मिनिटाला बंगाल वॉरियर्सने आपलं खातं उघडलं. पूर्वार्धातील सुरुवातीच्या ५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पुणेरी पलटनकडे ५-३ गुणांसह २ गुणांची आघाडी होती. सुरुवातीच्या १० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर पुणेरी पलटनने ९-७ गुणांसह आपली २ गुणांची आघाडी कायम ठेवली.

पूर्वार्धातील १२ व्या मिनिटाला पुणेरी पलटनने बंगाल वॉरियर्सला पहिला मोठा धक्का दिला. बंगाल वॉरियर्सचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह पुणेरी पलटनने १४-९ गुणदान ५ गुणांची आघाडी घेतली. पूर्वार्धात पुणेरी पलटनला देवांकला बराच वेळ बाहेर बसवण्यात यश आलं. याचा बंगाल वॉरियर्स संघाला मोठा फटका बसला. पूर्वार्धातील शेवटच्या मिनिटाला बंगाल वॉरियर्सने पुजारागमन करत पिछाडी कमी केली. पूर्वार्धातील २० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर पुणेरी पलटनचा संघ २१- १८ गुणांसह ३ गुणांनी आघाडीवर होता.

उत्तरार्धात बंगाल वॉरियर्सने दमदार सुरुवात केली. पुणेरी पलटनवर ऑलआऊटचं संकट होतं. पण आदित्य शिंदेने बोनस आणि १ गुण घेत ऑलआऊट वाचवला. उत्तरार्धातील पाचव्या मिनिटाला पुणेरी पलटनने सुपर टॅकल करत गुणसंख्येत आणखी २ गुणांची भर घातली. ७ व्या मिनिटाला पुणेरी पलटनचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह बंगालने पिछाडी ३ गुणांवर आणली.

सामन्यातील ९ व्या मिनिटाला पंकज मोहितेने सुपर रेड केली. उत्तरार्धातील सुरवातीची १० मिनिटे झाल्यानंतर दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत सुरू होती. पण पुणेरी पलटनने ३३- २९ गुणांसह आपली ४ गुणांची आघाडी कायम ठेवली. उत्तरार्धातील १६ व्या मिनिटाला आदित्य शिंदेने सुपर रेड मारत गुणसंख्येत आणखी भर घातली. शेवटची ५ मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनकडे ४३- ३५ गुणांची आघाडी होती. ५ व्या मिनिटाला बंगालचा संघ दुसऱ्यांदा ऑलआऊट झाला. शेवटच्या मिनिटात पुणेरी पलटनकडे ६ गुणांची आघाडी होती. शेवटी पुणेरी पलटनने हा सामना ४९- ४४ ने जिंकला